**धारावी पुनर्विकास प्रकल्प**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**
(महाराष्ट्र शासन अंतर्गत)
४ था मजला, गाला अल्टेझा इमारत, उद्योग नगर, ई, प्लॉट नं. १७अे, फ्लॅक रोड, षन्मुखानंद नाटयगृहाशेजारी, सायन, मुंबई ४०००२२
E-mail : drpsra@gmail.com Website : drpmumbai.maharashtra.gov.in संपर्क : ०२२-४६६०६६७२/ ४६६०६६७०

जा.क्र.झोपुप्रा/धापुप्र/प्रशासन/२८८/२०२६
दिनांक : १६.०३.२०२६

## धारावी पुनर्विकास प्रकल्प / झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

धारावी अधिसूचित क्षेत्रात राहणाऱ्या व धारावी पुनर्विकास प्रकल्पाकरिता आवश्यक दस्तऐवज सादर न करणाऱ्या झोपडीधारकांना अंतिम सूचना

(सार्वजनिक हितासाठी व नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांच्या पालनार्थ निर्गमित)

धारावीचा सर्वसमावेशक, न्याय्य व पारदर्शक पुनर्विकास करण्याच्या उद्देशाने, ही सूचना सार्वजनिक हितासाठी निर्गमित करण्यात येत आहे.

**ज्या अर्थी,** धारावी पुनर्विकास प्रकल्प / झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (यापुढे "**धापुप्र/झोपुप्रा**") हे महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, मंजुरी व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (महाराष्ट्र अधिनियम क्र. XXVIII of १९७१) च्या कलम ३-अ अंतर्गत स्थापन करण्यात आलेले वैधानिक प्राधिकरण असून, महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या शासन निर्णय क्रमांक एसआरए/२००३/सी. क्रमांक-१८९/एसआययूएम-१ए, दिनांक ०४.०२.२००४ अन्वये, धारावीचा पुनर्विकास एक व्यापक एकात्मिक विकास प्रकल्प म्हणून राबविण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे;

**आणि ज्या अर्थी,** धापुप्र/झोपुप्राने आपल्या वैधानिक कर्तव्यांच्या पूर्ततेसाठी धारावी पुनर्विकास प्रकल्प क्षेत्रात सार्वजनिक सूचना क्रमांक एसआरए/डीआरपी/ उपजिल्हाधिकारी /एफ क्रमांक ३१८/२७७/२०२४ दिनांक ११.०३.२०२४ अन्वये घरोघरी जाऊन व्यापक सर्वेक्षण हाती घेऊन ते यशस्वीरीत्या पार पाडले असून, सदर सर्वेक्षण शासन निर्णय क्रमांक एसआरपी १०००/सी. क्रमांक १२५/एसआरए-१ दिनांक १६.०५.२०१५ व एसआरपी ०८१०/सी. क्रमांक ९६/एसआरए-१ दिनांक १६.०५.२०१८ अन्वये करण्यात आले आहे;

**आणि ज्या अर्थी,** सर्वेक्षणादरम्यान प्राप्त झालेली माहिती व कागदपत्रांचे परीक्षण केल्यानंतर, नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन करण्याच्या दृष्टीने, धापुप्र/झोपुप्राने सर्व संबंधित व्यक्ती / घरप्रमुख / झोपडी धारक / मालक इत्यादींना (यापुढे "घरप्रमुख") अतिरिक्त संधी देणे उचित व आवश्यक असल्याचे ठरविले;

**आणि ज्या अर्थी,** धापुप्र/झोपुप्राने वेळोवेळी अनेक सूचना व स्मरणपत्रे निर्गमित करून, संबंधित घरप्रमुखांना अतिरिक्त कागदपत्रे, माहिती व पुरावे सादर करण्यासाठी वाजवी व पर्याप्त संधी प्रदान केली आहे;

**आणि ज्या अर्थी,** धापुप्र/झोपुप्राने सार्वजनिक सूचना क्रमांक झोपुप्रा/ धापुप्र/उपजिल्हाधिकारी ३/२०२४ दिनांक १७.१०.२०२५ अन्वये दिनांक ०१.११.२०२५ पासून दिनांक १५.११.२०२५ पर्यंत सुविधा शिबिरे (Facilitation Camps) आयोजित करून, घरप्रमुखांना प्रत्यक्ष उपस्थित राहून कागदपत्रे व माहिती सादर करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे;

**आणि ज्या अर्थी,** काही झोपड्यांचे सर्वेक्षण करताना तश्या झोपड्यांचा सर्वेक्षणात सहभागाचा अभाव, अनुपस्थिती अथवा झोपडी बंद असणे अथवा घरगुती वादामुळे किंवा इतर कारणांमुळे दस्तावेज न देणे याकारणांमुळे होऊ शकले नाही. अशा झोपड्यांबाबत धापुप्र/झोपुप्राने जनजागृती व माहिती–शिक्षण–संवाद (IEC) उपक्रम राबवून संबंधित घरप्रमुखांना आवश्यक कागदपत्रे व माहिती सादर करण्याचे आवाहन केले आहे;

**आणि ज्या अर्थी,** अनेक घरप्रमुखांनी या IEC उपक्रमांना सकारात्मक प्रतिसाद देऊन अतिरिक्त कागदपत्रे व माहिती सादर केली आहे, तथापि वारंवार संधी देऊनही काही घरप्रमुखांकडून आवश्यक माहिती व कागदपत्रे अद्याप प्राप्त झालेली नाहीत;

**आणि ज्या अर्थी,** धारावी पुनर्विकास प्रकल्प / झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे सक्षम अधिकारी, झोपडपट्टीधारकांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे पात्रतेची छाननी, तपासणी व पडताळणीची कार्यवाही करीत असून, संबंधित क्षेत्राच्या मसुदा परिशिष्टांच्या आधारे असे निदर्शनास आले आहे की, आपणास वारंवार लेखी व तोंडी स्वरूपात सूचित करूनही पात्रता निश्चितीच्या प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे आपण आजपर्यंत सादर केलेली नाहीत.

**त्या अर्थी,** नैसर्गिक न्याय, प्रक्रियात्मक निष्पक्षता व पारदर्शकतेच्या तत्त्वांचे काटेकोर पालन करत, धापुप्र/झोपुप्रा द्वारे ही अंतिम सूचना निर्गमित करीत असून, धारावी पुनर्विकास प्रकल्प क्षेत्रातील सर्व संबंधित घरप्रमुखांना त्यांच्या संरचनांशी संबंधित आवश्यक माहिती व कागदपत्रे सादर करण्याची अंतिम संधी देण्यात येत आहे.

**सूचना :**

सदर माहिती व कागदपत्रे अर्जासह कुरिअर, स्पीड पोस्ट अथवा वैयक्तिकरित्या खाली नमूद पत्त्यावर सादर करावीत. ही माहिती / कागदपत्रे या सूचनेच्या प्रकाशन दिनांकापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत प्राप्त न झाल्यास, धापुप्र/झोपुप्रा उपलब्ध अधिकृत अभिलेख, सर्वेक्षणातील माहिती व अन्य वैध स्रोतांच्या आधारे, लागू कायदे, नियम व शासन निर्णयांनुसार योग्य निर्णय घेईल.

**स्पष्टीकरण :**

ही सूचना धापुप्र/झोपुप्रा व महाराष्ट्र शासनाच्या वैधानिक अधिकारांना, शक्तींना व कर्तव्यांना बाधा न आणता (without prejudice) निर्गमित करण्यात येत असून, यामुळे धापुप्र/झोपुप्राचे कोणतेही कायदेशीर हक्क अथवा उपाय त्यागल्याचे समजले जाणार नाही.

ठिकाण : मुंबई.

(मा.मुकाअ तथा विकाअ /धापुप्र यांचे मान्यतेने)

**सही/-**
**सचिव**
**धारावी पुनर्विकास प्रकल्प**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**
चौथा मजला, गाला अल्टेझा, उद्योग नगर, ई, प्लॉट
क्रमांक १७-ए, फ्लँक रोड, षण्मुखानंद
सभागृहाच्या बाजूला, सायन, किंग्ज सर्कल
मुंबई -४०० ०२२.